दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- नगररचना व विकास

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/टे-८/२५९/१६ दि.१२/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे पिंपळे गुरव, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७९,८०, ८१, ८२, ८३, ८४ पैकी जागेतुन मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रं.३५५ सी.पी.जी.(लहान मुलांचे खेळाचे मैदान) या आरक्षणाचे जागेची शासकीय मोजणी करून घ्यावयाची असलेने मोजणी फी र.रू.४,५४,०००।– (अक्षरी र.रू.चार लाख चोपन्न हजार फक्त) अदा करणेस तसेच अनुषांगिक खर्च अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७५७ विषय क्रमांक – ३७

दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षेआ/५/कावि/५३७/२०१६ दि.१२/७/१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

निविदा नोटीस क्र.१/२०१६-१७ अन्वये ब क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील नाले साफ करुन नाल्यातील निघालेला गाळ वाहतुक करणे कामासाठी मे. अण्णासो मगर सेवा सह सं मर्या. यांनी नाले साफ सफाई कामी र.रु.९०.०० प्रती घन मी. व गाळ वाहतूकीसाठी र.रु.८९.०० प्रती घन मी. इतका सर्वात लघुत्तम दर स्विकारणेबाबत क्षेत्रीय अधिकारी यांनी दि. १८/०५/२०१६ च्या प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे. अण्णासो मगर सेवा सह सं मर्या यांना इकडील क्र. बक्षेआ/५/कावि/५३६/२०१६ दि.१२/७/२०१६ अन्वये करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७५८ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- संगीत अकादमी

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.संअ/१/कावि/८२/२०१६ दि.१३/०७/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निगडी येथे संगीत अकादमी असून, चिंचवड व संत तुकारानगर येथे संगीत वर्ग चालविले जातात. सदरच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून तेथील संगीत शिक्षकांकडून कामकाज करुन घेणे, विविध प्रकारच्या संगीत मैफीली आयोजित करणे, विविध संगीत स्पर्धांचे आयोजन करणेची कामे मानद सल्लागार म्हणून आंतरराष्ट्रीय किर्तीचे कलाकार पं. डॉ. नंदकिशोर कपोते, मानद सल्लागार हे सध्या मानधनावर काम पहात आहेत. त्यांची मानधनावरील मुदत दिनांक ०६/०४/२०१६ रोजी संपुष्टात येत आहे. पिंपरी चिंचवड संगीत अकादमीच्या सांगीतीक, शैक्षणिक कामकाजात एकसुत्रीपणा, सुरळीतपणा असावा व अकादमीचे संगीत विषय, दैंनदिन कामकाज सुरळीतपणे अधिक प्रभावीपणे चालावे याकरीता संगीत क्षेत्रातील संगीत तज्ञाचे मार्गदर्शन असणे आवश्यक असल्याने पं. डॉ. नंदकिशोर कपोते, मानद सल्लागारयांना पुढील ६ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेस व र.रु. १५,०००/- प्रतिमाह मानधन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७५९ विषय क्रमांक – ३९

दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- स्थापत्य

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/९५/२०१६ दि.१२/०७/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.०३/०६/२०१६-१७ मधील काम क्र. ३ अन्वये, पिंपरीचिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभागात वृक्षारोपनासाठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणे मे. डी डी कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२३,३७,५९९/- पेक्षा ३१.९९% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१६,६९,२९१/-पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७६०  विषय क्रमांक – ४०
दिनांक – १९/०७/२०१६  विभाग- स्थापत्य
सुचक – मा.सुमन नेटके  अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/९६/२०१६ दि.१२/०७/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.०३/०६/२०१६-१७ मधील काम क्र. ४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड प्रभागात वृक्षारोपनासाठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणेकामी मे. डी डी कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२३,३७,५९९/- पेक्षा ३१.९९% कमी या ठेकेदारा कडून निविदा मंजूर दराने र.रू.१६,६९,२९१/- पर्यत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७६१  विषय क्रमांक – ४१
दिनांक – १९/०७/२०१६  विभाग- इ क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.संदीप चिंचवडे  अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२२१/१६ दि.१२/०७/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या विद्युत विभागाच्या नि.नो.क्र.7/2-2015-16 मधील अ.क्र.1 अन्वये भोसरी उपविभागाअंतर्गत प्रभाग क्रमांक ३३ व ३५ मधील सारथी विषयक व नागरिकांच्या मागणीप्रमाणे स्ट्रीटलाईटची सन २०१५-१६ मध्ये देखभाल दुरुस्ती करणे व अनुषंगीक विद्युत विषयक कामे करणे कामी मे.अवधूत इलेक्ट्रीकल लाईफ एन्ड सर्व्हीसेस ( निविदा रक्कम रू.556295/- (अक्षरी र.रु.पाच लाख छपन्न हजार दोनशे पंच्याण्णव फक्त) पेक्षा 39.98% कमी) या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७६२  विषय क्रमांक – ४२
दिनांक – १९/०७/२०१६  विभाग- ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.संदीप चिंचवडे  अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षे/स्था/काअ/११/७१/२०१६ दि.१३/७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्र.२४ (प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) मध्ये प्रा.रामकृष्ण मोरे नाटयगृहाचे नुतनीकरण करणे या कामास वास्तुविशारद नेमणेबाबत कामासाठी श्री.सचिन आपटे यांची नेमणुक रद्द करुन मनपा पॅनेलवरील किमया आर्किटेक्ट यांची वास्तुविशारद म्हणुन नेमणुक करणेस तसेच सदरचा प्रस्ताव मान्यतेनंतर वास्तुविशारद किमया आर्किटेक्ट यांना मनपाच्या आर्किटेक्ट फी स्ट्रक्चर मा. स्थायी समिती ठराव क्र.११२६२, दि.०५/१०/२००५ (Annexure-I) मधील मनपा दरानुसार म्हणजे र.रु.५० लाखांचे वरील कामांस २% नुसार फी देयक अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७६३ विषय क्रमांक – ४३
दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- विद्युत मुख्यालय
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/३८/२०१६ दि.१२/७/२०१६

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.2/2015-2016 मधील अ.क्र.1 अन्वये वायसीएमएच येथील वॉटर गिझरचे देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.हसन इलेक्ट्रीकल इंजिनिअर नि.र.रू.93,178/- [अक्षरी र.रू. त्र्याण्णव हजार एकशे अठ्याहत्तर फक्त] पेक्षा 21.66% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७६४ विषय क्रमांक – ४४
दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/५४८/१६ दि.१२/७/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.36/21/2015-16 अन्वये प्रभाग क्र.५८ मध्ये मुख्यालय स्तरावर किरकोळ दुरूस्तीची व देखभालीची कामे करणेकामी मे.के.पी.कन्स्ट्रक्शन नि.र.रु.14,00,560/- (अक्षरी र.रु.चौदा लाख पाचशे साठ फक्त) पेक्षा 40.50% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.8,75,000/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचे बरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७६५ विषय क्रमांक – ४५
दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- माध्यमिक शिक्षण विभाग
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/२३२/१६ दि.१४/७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

माध्यमिक शिक्षण विभागाकडील गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ कार्यक्रमासाठी १८ माध्यमिक विद्यालयातील ८०% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या १०४ व अंध व अपंग १२ असे एकूण ११६ विद्यार्थांना दयावयाचे प्रोत्साहन पर रक्कम रू. ४९,००,०००/- व कार्यक्रम आयोजनासाठी येणारा अपेक्षित खर्च र.रू. ४०,०००/-(अक्षरी र.रू. चाळीस हजार फक्त) आगाऊ रक्कम मा. अधिक्षक (माध्य) शिक्षणाधिकारी यांचे नावे अदा करणेस व सदरचा खर्च थेट पध्दतीने खुल्या बाजारातुन करारनामा न करता करणेस तसेच सन २०१६-१७ मध्ये माध्यमिक शिक्षण विभागाकडील गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७६६ विषय क्रमांक – ४६
दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- मध्यवर्ती औषध भांडार
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मऔभां/१/कावि/१५८/२०१६ दि.१३/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

म.न.पा.दवाखाने/रूग्णालयांसाठी आवश्यक असणा-या औषधे/साहित्यासाठी करणेत आलेल्या र.रू.१० कोटीच्या तरतुदीमधुन निविदा क्र.४/२०१४-१६ च्या मान्य लघुत्तम दरानुसार र.रू.४ कोटीची प्रस्तावात नमूद प्रमाणे औषधे/साहित्य खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७६७ विषय क्रमांक – ४७
दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- क क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/५७६/२०१६ दि.१४/०७/२०१६
विषय:-सांगवी दापोडी व नवी सांगवी येथील पवना नदीपात्रातील जलपर्णी/हायसिंथ काढणेबाबत.

विषय क्रमांक ४७ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७६८ विषय क्रमांक – ४८

दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- विद्युत मुख्य कार्यालय

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भः-मा.सह शहर अभियंता(वि.मु.का) यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/१९३/२०१६ दि.१४/७/२०१६

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.19/2015-16 मधील अ.क्र.12 अन्वये अशुद्ध जलऊपसा केंद्र रावेत येथे सी.सी.टि.व्ही यंत्रणा उभारणे कामी मे.फिनिक्स इंफ्रास्ट्क्चर्स नि.र.रू.22,54,306/- (अक्षरी र.रू.बावीस लाख चोपन्न हजार तीनशे सहा फक्त) पेक्षा 0.54% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७६९ विषय क्रमांक – ४९

दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भः-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/८५६/२०१६ दि.१३/०७/२०१६

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूद प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरी कामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७७० विषय क्रमांक – ५०

दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भः-मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/३६३/२०१६ दि.१४/०७/२०१६

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे निवडणूक विभागास प्रभाग क्र.०८ जागा अ पोटनिवडणुक २०१६ करिता आवश्यक व्हीडीओ चित्रीकरण करणेकामी को. नो.सु क्र.४१/२०१५-१६ अन्वये लघुत्तम निविदाकार मे. राहुल व्हीडोओ अँड शुटींग, पिंपरी यांचे व्हीडीओ चित्रीकरण र.रु.७९९/- प्रती दिवस प्रती कॅमेरा, कॅमेरामन व सिडीसह आलेले आहेत. निवडणुक विभागाने जादा कॅमेरे लावलेने, जादा झालेले बिल र.रु.११९८५/- (अक्षरी र.रु.अकरा हजार नउशे पंच्याऐंशी फक्त) अदा करणे आवश्यक असल्याने खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –६७७१ विषय क्रमांक – ५१

दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- क्रीडा

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.विमल काळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/४१२/२०१६ दि.०१/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र.५९ दि.११/७/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे ४११ ०३३ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जुलै २०१६ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनीषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क चिंचवड पुणे ४११ ०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१६-१७ (पुरुष, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.३,६४,१६०/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेस सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरीत र.रू.२,९४,१६०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –६७७२ विषय क्रमांक – ५२

दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- क्रीडा

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.विमल काळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/२९३/२०१६ दि.०४/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र ६० दि. ११/७/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, महाराष्ट्र राज्य कबड्डी असो., पुणे जिल्हा कबड्डी असो. यांचे मान्यतेने, जय गणेश युवा फाउंडेशन, विनायक नगर, बो-हाडेवाडी मोशी, पुणे ४१२ १०५ यांच्या सहकार्याने, पावसाळा संपल्यानंतर ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०१६ या काळात विनायक नगर, बो-हाडेवाडी मोशी, पुणे ४१२ १०५ येथे महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१६-१७ (महिला व पुरुष) आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद केले प्रमाणे येणा-या अंदाजे एकूण र.रू.३०,०१,७६४/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरच्या खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रू.६,६८,०००/- हा स्थापत्य विभाग, संबंधित प्रभाग व विद्युत

विषयक खर्च र.रू.२,००,०००/- हा खर्च विद्युत विभाग, संबंधित प्रभाग यांचे लेखा शिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रू.२१,३३,७६४/- क्रीडा विभागाचे, महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने मेडल्स, ट्रॉफीज, सन्मान चिन्हे, फ्लेक्स बॅनर, फक्की कोटेशन नोटीस प्रसिद्ध करून खरेदी करणेस व प्रमाणपत्रे, निमंत्रण पत्रिका ई.भांडार विभागाकडून करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –६७७३ विषय क्रमांक – ५३

दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- क्रीडा

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.विमल काळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/४१८/२०१६ दि.०५/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र.६१ दि.११/७/२०१६ अन्वये शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर, पंच मानधन, पंच चहा अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पूजा खर्च, स्टेशनरी खर्च, फक्की, क्रीडा साहित्य खरेदी कोटेशन/निविदा पद्धतीने करणे, स्पर्धा आयोजन सभा चहापान, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे इतर खर्च इ. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांचे दि.१६/९/२०१५ चे इतिवृत्तामध्ये मंजूर केलेप्रमाणे, जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१६-१७ पासून म.न.पा.कडून प्रति दिन पंच मानधन र.रु.२५०/-व त्यांना प्रति दिन दोन वेळेचा चहा व अल्पोपहार करिता र.रु.५०/-असे प्रतिदिन प्रतीपंच मानधन र.रू.३००/- खर्च मंजूर करणेस, सन २०१६-१७ मध्ये विभागस्तर स्पर्धेसाठी म.न.पा. शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटने मार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू, त्यांचे समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च, दैनिक भत्ता, प्रवेश फी औषध खर्च इ.अदा करणे कामी अंदाजे र.रु.१,५०,०००/- असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.१३,७९,९५०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१६-१७ अनुषंगाने येणारा खर्च हा क्रीडा निधी - वार्षिक क्रीडा स्पर्धा व क्रीडा कला साहित्य या लेखाशिर्षावर केलेल्या एकूण तरतूद र.रु.४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१६-१७ अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, मैदान तयार करणे, ध्वनी/विद्युत व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरूपाचा खर्च हा क्षेत्रीय कार्यालयामार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांच्या अंदाजपत्रकातुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –६७७४ विषय क्रमांक – ५४

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.विमल काळे

संदर्भ:-मा.तानाजी खाडे, मा.अरूण बो-हाडे यांचा प्रस्ताव-

मा. क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र. ६३ दि.११/७/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड मनपाच्यावतीने प्रभाग क्र.३६ लांडेवाडी भोसरी गणपती मंदिर येथे लांडेवाडी भोसरी व्यायामशाळा चालविली जाते. नव महाराष्ट्र तरुण मित्रमंडळ, लांडेवाडी भोसरी पुणे यांनी मनपा प्रभाग क्र.३६ लांडेवाडी भोसरी गणपती मंदिर येथे लांडेवाडी भोसरी व्यायामशाळा ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत मागणी केलेली आहे. मनपाची प्रभाग क्र.३६ लांडेवाडी भोसरी गणपती मंदिर येथील व्यायामशाळा नव महाराष्ट्र तरुण मित्रमंडळ, लांडेवाडी भोसरी पुणे यांना ११ महिने कराराने दर महा र.रु.२,०००/- मनपाकडून सेवाशुल्क देऊन सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –६७७५ विषय क्रमांक – ५५

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ:-मा.तानाजी खाडे, मा.अरूण बो-हाडे यांचा प्रस्ताव-

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र. ६४ दि.११/७/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने धावडेवस्ती भोसरी येथे व्यायामशाळा चालविली जाते. सिध्देश्वर युवा क्रांती मित्र मंडळ, धावडेवस्ती यांनी मनपाची धावडेवस्ती व्यायामशाळा ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत मागणी केलेली आहे. तरी मनपाची धावडेवस्ती व्यायामशाळा, सिध्देश्वर युवा क्रांती मित्र मंडळ, धावडेवस्ती यांना ११ महिने कराराने दर महा र.रु.२,०००/- मनपाकडून सेवाशुल्क देऊन सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –६७७६ विषय क्रमांक – ५६

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ:-मा.तानाजी खाडे, मा.अरूण बो-हाडे यांचा प्रस्ताव -

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र. ६५ दि.११/७/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड मनपाच्यावतीने साई शारदा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, कासारवाडी येथे मनपाची साई शारदा महिला व्यायामशाळा कासारवाडी, पुणे ही व्यायामशाळा चालविली जाते. सदर व्यायामशाळा हिंदवी मित्र मंडळ, कासारवाडी यांना मनपा अटी शर्तीनुसार ११ महिने कराराने दर

महा र.रु.२,०००/- मनपाकडून सेवाशुल्क देऊन सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –६७७७ विषय क्रमांक – ५७

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ:-मा.तानाजी खाडे, मा.अरूण बो-हाडे यांचा प्रस्ताव-

मा. क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र ६६ दि.११/७/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड मनपाच्यावतीने पुनावळे येथे व्यायामशाळा चालविली जाते. सदर व्यायामशाळा सम्राट अशोक विचार मंच ट्रस्ट, पुनावळे वस्ती, पुनावळे यांना मनपा अटी शर्तीनुसार ११ महिने कराराने दर महा र.रु.२,०००/- मनपाकडून सेवाशुल्क देऊन सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –६७७८ विषय क्रमांक – ५८

दिनांक – १९/०७/२०१६ विभाग-क्रीडा

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ:-मा.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/९६/२०१६ दिनांक ८/७/२०१६

विषय:-सन २०१६-२०१७ मध्ये महिला मुलींना योग प्रशिक्षण देणे, ही योजना राबविणे बाबत.

विषय क्रमांक ५८ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –६७७९ विषय क्रमांक – ५९

दिनांक – १९/०७/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/२०/कावि/४१८/२०१६ दि.१४/०७/२०१६

विषय:-मनपाचे क्रीडा विभागासाठी विविध प्रकारचे व्यायामशाळा साहित्य खरेदीबाबत..

विषय क्रमांक ५९ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले-</u>**

ठराव क्रमांक – १६७८० विषय क्रमांक – ६०

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम ही प्रशिक्षण योजना गेल्या तीन वर्षापासुन मनपा स्तरावर राबविण्यात येते. सदर योजना गेल्या तीन वर्षापासुन मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत वस्तीपातळीवर अगदी प्रभावीपणे राबविलेली आहे.यावर्षीही मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मार्फत मागील वर्षीच्याच प्रशिक्षण विषयांचे प्रशिक्षण हे मागील वर्षीच्याच महिला लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती) व दरानुसार मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.१६०७१ दि.२०/०४/२०१६ या ठरावा सोबतच्या प्रपत्र–अ मधील नमुद तपशीलानुसार दि. ३१/०३/२०१७ अखेर पर्यंतच्या कालावधी पर्यंतचे प्रशिक्षणाचे काम हे मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचे मार्फत देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र सदरच्या प्रशिक्षण योजनेस केंद्रशासनाच्या सेवाकर विभागातर्फे आकरण्यात येणारा सेवाकर देय/लागु आहे. त्यानुसार संस्थेमार्फत होणा-या प्रशिक्षणापोटीच्या देय रक्कमेच्या अनुषंगाने नियमानुसार होणा-या सेवाकराची रक्कम ही उपरोक्त नमुद ठरावासोबतच्या प्रपत्र – अ मधील प्रशिक्षण विषय निहाय प्रशिक्षण शुल्कानुसारच्या देय रक्कमे व्यतिरिक्त वाढवुन द्यावी लागणार आहे. मा.नगरसेविका/नगरसेवकांच्या निवडणुकीची संभाव्य आचारसंहिता चालु आर्थिक वर्षात लागणेपुर्वी प्रशिक्षणाचे कामकाज सुरु असावे यासाठी तसेच सेवाकराची रक्कम ही शासनास भरावी लागणार असल्याने व ठरावानुसारच्या दरात होणा-या प्रशिक्षणापोटीची रक्कम फक्त मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेला मिळणार असल्याने चालु वर्षात सदर प्रशिक्षण योजनेपोटी होणा-या प्रशिक्षणानुसारची व होणा-या प्रशिक्षणानुसारच्या देय रक्कमेवर होणा-या सेवाकराची रक्कम ही लेखाशिर्ष महिलांसाठी योजना/महिला व बालकल्याण योजना उपलेखाशिर्ष :- महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम यातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे. सदरकामी आवश्यक ती कार्यवाही करुन रक्कम अदा करणेबाबतचा संपुर्ण अधिकार मा. आयुक्त सो. यांना देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७८१ विषय क्रमांक – ६१

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

झो.नि.पु स्थापत्य विभागाकडील प्रस्तावात नमूद प्रमाणे किरकोळ दुरूस्ती व देखभाल करणे या लेखाशिर्षावरील तरतूदीत फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. १,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७८२ विषय क्रमांक – ६२

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

स्थापत्य उद्यान विभागाकडील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील कामाच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.
(वाढ/घट र.रू. १५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७८३ विषय क्रमांक – ६३

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये विकास कामे करणे कामी प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.
(वाढ/घट र.रू. ६,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७८४ विषय क्रमांक – ६४

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. ४,५५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७८५ विषय क्रमांक – ६५

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती ठराव क्र.१६५९७ दि.२८/६/२०१६ रद्द करणेस व क प्रभागातील अंदाज पत्रकामधील प्रस्तावात नमूद प्रमाणे विकास कामांमध्ये वाढ/ घट करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. ९०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७८६ विषय क्रमांक – ६६

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

प्र.क्र.१४ से.नं.२५ निगडी प्रधिकरण येथील सावित्रीबाई फुले व्यायामशाळा, देवगिरीकर नृत्य कला मंच या संस्थेस देखभाल संरक्षण व चालन कामी योग्य त्या अंशत सेवा शुल्क तत्वावर एक वर्षे कालावधीकरीता देण्यास व त्या कामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७८७ विषय क्रमांक – ६७

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

स्थायी समिती ठराव क्र. १६६५५ दि. ५/७/२०१६ रद्द करणेस व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये विकास कामे करणे कामी प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.७,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७८८ विषय क्रमांक – ६८

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

स्थायी समिती ठराव क्र.१६६५४ दि.५/७/२०१६ रद्द करणेस व महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.११,२२,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७८९ विषय क्रमांक – ६९

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

ड मुख्यालयामध्ये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात भांडवली विषयक कामांच्या तरतूदी मध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.
(वाढ/घट र.रू.८,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७९० विषय क्रमांक – ७०

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र. ३१ दिघी येथील कामासाठी प्रस्तावात नमूद केले प्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.
वाढ/घट र.रू.६३,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७९१ विषय क्रमांक – ७१

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -

ड मुख्यालयामध्ये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात भांडवली विषयक कामांच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे वाढ/घट करण्यास मान्यता देणेत येत आहे.
(वाढ/घट र.रू. ३०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७९२ विषय क्रमांक – ७२

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -

मनपाचे खालील नमूदप्रमाणे वॉर्डात नागपंचमी साजरी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.प्रभाग क्र.२१,५४,१३,१६,४२,४७,१७,७,४१,२७,३९,४

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७९३ विषय क्रमांक – ७३

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड मनपाची मा.आयुक्त बंगला येथे व्यायाम शाळा असून, सदरचे व्यायामशाळे करिता १) मोटोराईजड ट्रेड मिल २) मोटोराईजड बाईक ३) डंबेल्स इ. व्यायाम शाळा साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी कोटेशन नोटीस पध्दतीने करणेस व सदरचे येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७९४ विषय क्रमांक – ७४

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -

मे.सामर्थ इंडिरिअर, बाणेर, पुणे यांची महापालिकेच्या पॅनेलकर आर्किटेक्चर (वास्तूशास्त्रज्ञ) म्हणून नियुक्ती करणे व त्यांना आर्किटेक्ट विषयक कामे देण्यास व त्याकामी येणारी फी वेळोवेळी आर्किटेक्ट कौन्सिलचे नियमानुसार त्यांना फी अदा करणेस तसेच याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७९५ विषय क्रमांक – ७५

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -

फ क्षेत्रीय कार्यालय मुख्यालयाचे सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रामध्ये कामाच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७९६ विषय क्रमांक – ७६

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -

मा.सभापती स्थायी समिती यांना आणखी एका स्वीय सहाय्यकाची आवश्यकता असल्याने श्री.ज्ञानेश्वर किसनराव पिंगळे, मुख्य लिपिक यांची मा.सभापती, स्थायी समिती यांचे स्वीय सहाय्यक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तरी त्यांचे मोबाईलचे दरमहा बिल पुर्वीप्रमाणेच मनपा नियमानुसार महापालिकेमार्फत अदा करणेस तसेच श्री.गोरखनाथ शंकर लिमण, मुख्य लिपिक यांची मा.महापौर यांचे स्वीय सहाय्यक म्हणून नेमणूक झाली असल्याने त्यांचे मोबाईलचे दरमहा बिल मनपा नियमानुसार महापालिकेमार्फत अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७९७ विषय क्रमांक – ७७

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. १९,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७९८ विषय क्रमांक – ७८

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

अ क्षेत्रीय कार्यक्षेत्रात होणा-या विविध कार्यक्रमांसाठी मंडप विषयक कामे करणे (निविदा क्र.१८/१९/२०१५-१६) या कामाचे निविदा दर वजा जाता सुधारीत खर्च र.रू.४९,५०,०००/- (वाढीव खर्च र.रू. २४,६०,०००/-) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६७९९ विषय क्रमांक – ७९

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

विठ्ठल रूक्मिणी मूर्ती खरेदी निविदा आल्हाट आर्ट स्टुडिओ यांनी भरली असून र.रू. ४१००/- प्रती मुर्ती हा दर भरला असून सदरचा दर हा सेकंड लोएस्ट दर असून त्यांनी सदरच्या मूर्तीचे २७५०/- हा दर इतर खरेदीदारांना दिला असून या संदर्भात वर्तमान पत्रात दिशाभूल करणारी बातमी प्रसिध्द केल्यामुळे मनपा अधिकारी व पदाधिका-यांवर बदनामीचे आरोप झाले असल्यामुळे त्यांना निविदा भरण्यास तीन वर्षाकरिता प्रतिबंधीत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८०० विषय क्रमांक – ८०

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.सविता साळुंके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

मनपाच्या वतीने कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी, पुणे येथे माहे ऑगस्ट २०१६ मध्ये ऑलिम्पिक छायाचित्र प्रदर्शन-२०१६ आयोजित करणेस व त्याकामी अंदाजे र.रू. ५,४५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे त्यास मान्यता व सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रू. १,००,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रू. १,००,०००/- हा संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्चा टाकणेत येईल व उर्वरीत र.रू. ३,४५,०००/- हा खर्च क्रीडा विभागाचे क्रीडा निधी मनपा तर्फे आयोजित विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच पी.व्ही.सी. फ्लेक्स बॅनर, साहित्य स्टेशनरी खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस, निमंत्रणपत्रिका व हॅंडबील छपाई इ. भांडार विभागाकडून करून घेणेस अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८०१ विषय क्रमांक – ८१

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक-मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.संदीप चिंचवडे, मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव –

क प्रभागातील अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूदप्रमाणे विकास कामांमध्ये वाढ/घट करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. ४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८०२ विषय क्रमांक – ८२

दिनांक – १९/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१६६२४ दि.०५/०७/२०१६ मधील एक महिन्यापर्यंत किंवा आवश्यक कालावधीपर्यंत चालू ठेवणे कामी येणा-या खर्चास हा मजकूर वगळण्यात यावा व त्या ऐवजी एक महिन्याचे कालावधी पर्यंत चालू ठेवण्यास व येणा-या र.रू. ६,००,०००/- + २०,०००/- शिफ्टिंगचे खर्चास हा मजकूर समाविष्ट करण्याचे दुरूस्तीसह मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/११/कावि/९९१/२०१६
दिनांक – २०/०७/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.